Maharashtra Times
http://maharashtratimes.indiatimes.com/articleshow/24766162.cms
आहे मनोहर तरी...
Oct 26, 2013, 09.38PM IST
प्रा. मिलिंद जोशी

मासिक मनोरंजनकार काशिनाथ रघुनाथ मित्र यांनी मराठीतला पहिला दिवाळी अंक १९०९मध्ये प्रसिद्ध केला. मराठी साहित्य-संस्कृती आणि समाजमानस समृद्ध करण्याचे काम करणारी दिवाळी अंकाची परंपरा १०५ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. या निमित्ताने दिवाळी

अंकांच्या सद्यस्थितीवर दृष्टिक्षेप.

राजकारण , नाटक , नाट्यसंमेलन आणि साहित्य संमेलन यांच्याइतकेच मराठी माणसांना आकर्षण आहे ते दिवाळी अंकांचे. दिवाळी अंक हा दीपोत्सवाच्या साक्षीने साजरा होणारा शब्दोत्सव आहे. दीपोत्सवामुळे आसमंत प्रकाशमान होतो आणि विचारांच्या शब्दोत्सवामुळे

अंतरंग समृद्ध होते. १८९५ साली सुरू झालेल्या आणि चाळीस वर्षांहून अधिक काळ महाराष्ट्राचे भरणपोषण करणाऱ्या मनोरंजनने १९०९ साली मराठीतील पहिला दर्जेदार दिवाळी अंक प्रसिद्ध केला तो दोनशे पृष्ठांचा होता. त्याची किंमत एक रुपया होती. या अंकाचे संपादक

होते काशिनाथ रघुनाथ मित्र. त्यांना प्रेरणा मिळाली ती बंगालमधील दुर्गापूजा विशेषांकातून.

आजच्या दिवाळी अंकांनीही आदर्श मानावे असे त्याचे स्वरूप होते. धर्माची आवश्यकता , राष्ट्रोन्नती , सुख कशात आहे , स्त्री शिक्षण , पूर्वकालीन भारतीय समाजात स्त्री वर्गाची स्थिती , महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासातील काही ठळक गोष्टी , सामाजिक सुधारणा करणार

की , होऊ देणार ? कलीयुगातील पंधरावी विद्या , गणित आणि गणितज्ज्ञ , पीतवर्ण चिनी लोक , अशोकाच्या शिलालेखातील वेचे , मुले उपजण्यापूर्वी आई-बापांची त्यांच्याबद्दल जबाबदारी , चित्रकला , कामकरी वर्गाची संहिता , सामाजिक सुधारणेसंबंधी स्त्रियांची कर्तव्ये

, तुकाराम , वकील आणि अशील , स्वदेशी व औद्योगिक बहिष्कार , लग्नविचार , विधवा विवाह , चालू चळवळींचा मुलांच्या मनावर होणारा परिणाम अशा अनेक विषयांना स्पर्श करणारे लेख त्यात समाविष्ट होते. साहित्यसम्राट न. चिं. केळकर , धर्मानंद कोसंबी ,

न्या. चंदावरकर , नामदार गोपाळकृष्ण गोखले , सौ. क्षमाबाई राव , रा. गो. भांडारकर , विठ्ठल रामजी शिंदे , श्रीपाद कृष्ण कोल्हटकर , सीनियर रँगलर परांजपे , श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी , मथुराबाई जोशी , गिरीजाबाई केळकर , काशीबाई कानिटकर , लक्ष्मीबाई

, रेव्हरंड टिळक , बालकवी अशा सर्व क्षेत्रातील दिग्गजांच्या लेखनामुळे या अंकांची श्रीमंती वाढली होती. त्या काळात छपाईचे फारसे तंत्रज्ञान विकसित झालेले नसतानाही ११३ हून अधिक नामवंतांच्या छायाचित्रांनी हा अंक सजविला होता. साहित्याचा दर्जा , मुद्रितशोधन ,

मांडणी , छपाई , सत्तरहून अधिक जाहिरातींसाठीची व्यवस्था अशा या अंकातल्या सर्व गोष्टींकडे संपादकांनी किती बारकाईने लक्ष दिले होते हे आजदेखील तो अंक पाहताना जाणवते. समकालीन साहित्य आणि समाजव्यवहाराचे प्रतिबिंब या अंकात उमटलेले दिसून जेमतेम

एकोणिसाव्या शतकापासून सुरू झालेल्या वाङ्मयीन नियतकालिकाच्या वाटचालीत १९५०-७५ हा भरभराटीचा काळ होता. १९४४-४५ च्या सुमारास बहुतेक सर्व प्रकारच्या नियतकालिकांनी दिवाळी अंक प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली. यामुळे वाङ्मय निर्मितीला मोठी चालना

मिळाली. कथा , कविता , कादंबरी , ललितगद्य , आठवणी , चरित्रे , प्रवासवर्णने , वैचारिक लेखन , मुलाखती यांसारख्या लेखनप्रकारांना दिवाळी अंकात स्थान मिळाले. पृष्ठे आणि शब्दसंख्येची मर्यादा नसल्यामुळे दीर्घकथा , लघुकादंबरी , कादंबरी यांसारख्या

वाङ्मयप्रकारांच्या लेखनाला दिवाळी अंकांच्या निमित्ताने चालना मिळाली. दिवाळी अंकात लेखन प्रसिद्ध होणे हे लेखकाच्या प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाऊ लागले.

लेखकाच्या अनेक पिढ्या दिवाळी अंकांनी घडविल्या आणि संपादकांनाही मोठेपण मिळवून दिले. १९६० नंतर मराठी साहित्यात आलेल्या दलित , ग्रामीण , स्त्रीवादी , परिवर्तनवादी , प्रस्थापितविरोधी प्रवाहांनाही दिवाळी अंकांनी सामावून घेतले. त्यानंतर या विचारधारांचे

स्वतंत्र अंकही निघाले. दिवाळी अंक सुंदर कलात्मक रूपात प्रसिद्ध होऊ लागले. या वाटचालीतले चित्रकारांचे योगदानही महत्त्वाचे आहे. अनेक नवोदित लेखकांना व्यासपीठ मिळवून देणारे आणि प्रस्थापित लेखकांना प्रतिष्ठा मिळवून देणारे एक माध्यम म्हणून दिवाळी

अंकांकडे पाहिले जावू लागले. अनेक ज्वलंत सामाजिक प्रश्नांचे वैचारिक अभिसरण दिवाळी अंकांच्या माध्यमातून घडू लागले. आज मराठीत तीनशेहून अधिक दिवाळी अंक प्रसिद्ध होतात. त्यातील केवळ ललित साहित्यासाठी वाहिलेल्या अंकांची संख्या बोटावर मोजण्याइतकी

मर्यादित आहे. दिवाळी अंकांची संख्यात्मक वाढ होत असताना प्रकाशित होणाऱ्या साहित्याची गुणवत्ता हा चिंतेचा विषय नाही , असे म्हणता जेणार नाही. काही दिवाळी अंकांचे संपादक केवळ जाहिरातींच्या बळावर अंक काढून स्वत:ची दिवाळी अर्थसंपन्न कशी होईल ,

याचाच विचार करताना दिसतात. मौज , पद्मगंधा , दीपावली , दीपलक्ष्मी , अंतर्नाद , अनुभव , विशाखा , रुची , हंस , मोहिनी , नवल , माहेर , मेनका , अक्षर , वसंत , साधना , किस्त्रीम , संस्कृती , तारका , ऋतुरंग , विश्रांती , चिंतन आदेश , धनंजय ,

चंद्रकांत , मुशाफिरी , कॉमेडी कट्टा , ग्राहकहित , नीहार , साहित्य शिवार , मिळून साऱ्याजणी , सत्याग्रही , विवेक , जत्रा , आवाज , अपेक्षा , चपराक यांच्यासह निवडक वृत्तपत्रांचे दिवाळी अंक आजही वाचकांच्या आकर्षणाच्या केंद्रबिंदू बनलेले आहेत. ते त्यात प्रसिद्ध

होणाऱ्या कसदार साहित्यामुळेच गेल्या काही वर्षांत ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या आहेत. त्यामुळे वाचकांची अभिरुची आणि प्राधान्यक्रमही बदलले आहेत. त्यामुळे तज्ज्ञांना

कथा , कविता , कादंबरी अशा ललित साहित्यापेक्षा अद्ययावत माहिती देणारे ज्ञानलक्षी साहित्य अधिक

महत्त्वाचे वाटते. बदलत्या जीवनशैलीमुळे आरोग्याच्या गंभीर होत चाललेल्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी शतायुषी , आरोग्यदर्पण आणि तत्सम आरोग्यविषयक दिवाळी अंकांचे आकर्षण वाढते आहे. जागतिकीकरणानंतर पैसा हेच साध्य आणि सर्वस्व झाल्यामुळे अर्थविषयक

गोष्टी समजल्या पाहिजेत. या भूमिकेतून अर्थसाक्षरता वाढविणाऱ्या ' अर्थपूर्णम ' सारख्या अर्थविषयक मार्गदर्शन करणाऱ्या अनेक दिवाळी अंकांकडे वाचक आकृष्ट होत आहेत. वाढती स्पर्धा , ताणतणाव , अशांतता आणि आजच्या युगातले बदलते नातेसंबंध यांमुळे

मन:शांतीच्या शोधात असलेली माणसे अध्यात्म आणि ग्रहांकित , भाग्यसंकेतसारख्या ज्योतिषविषयक दिवाळी अंकात आधार शोधताना दिसतात. शिक्षण , पालकत्व , अनुवाद , पाककला , पर्यावरण , पर्यटन , चित्रपट , गडकोट यांसारख्या विशिष्ट विषयाला वाहिलेल्या

दिवाळी अंकांचीही मागणी आणि संख्या वाढत आहे. आधुनिक युगातील मुलांचे बदलते भावविश्व विचारात घेऊन बालकुमारांसाठी प्रसिद्ध होणारे छात्रप्रबोधन , छावा , किशोर , टॉनिक , निर्मळ रानवारा हे दिवाळी अंक आपला ठसा कायम ठेवून आहेत.

हातात पुस्तके घेऊन वाचणाऱ्यांपेक्षा संगणकावर वाचणाऱ्यांची संख्या अधिक आहे. ई-दिवाळी अंकाचेही आकर्षण वाढते आहे. वाचन संस्कृतीचा पोत बदलतो आहे. हे ही दिवाळी अंक काढणाऱ्यांनी लक्षात घेतले पाहिजे. ज्येष्ठ साहित्यिक जयवंत दळवी म्हणत , ' मी शाळेत

असताना भूतकाळ , वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ असे तीन काळ शिकलो होतो ; पण साहित्यक्षेत्रात आल्यावर चौथा काळ शिकलो. तो म्हणजे पडता काळ ! ' या मानसिकतेतून अजूनही मराठी साहित्यक्षेत्र बाहेर पडायला तयार नाही. जुन्या पिढीला नव्या पिढीत

ताकदीचे लेखक , चित्रकार , संपादक , प्रकाशक , मुद्रितशोधक आहेत असे वाटत नाही ; पण परिस्थिती तशी नाही. तरुण पिढीचे संपादक दर्जेदार दिवाळी अंक काढत आहेत. जाणत्या लोकांनी या नव्या पिढीबाबत आशावादी असायला हवे.

काही दिवाळी अंकांनी अक्षरश: काही नामवंत लेखकांना आपल्या अंकासाठी बांधून टाकले आहे. वर्षानुवर्षे त्यांचे लेखन त्याच अंकात प्रसिद्ध होताना दिसते. त्यामुळे अंकांनाही एक प्रकारचे साचलेपण आले आहे. या संपादकांचे प्रतिभेच्या नव्या कवडशांकडे लक्ष नाही. आज

साहित्य निर्मितीचा केंद्रबिंदू पुणे-मुंबईपासून दूर ग्रामीण , आदिवासी , दुर्गम भागाकडे सरकतो आहे. डॉक्टर , इंजिनीअर , वकील यांच्यासह सर्व क्षेत्रांतील माणसे लिहू लागली आहेत. यामुळे साहित्याचे अनुभवविश्व समृद्ध होत आहे. या बदलांकडे दिवाळी अंकाच्या

संपादकांनी गंभीरपणे पाहिले पाहिजे. दिवाळी अंकांना जाहिरातीच्या रूपाने आर्थिक मदत करणे हे समाजातील धनाढ्य साहित्यप्रेमींना आणि उद्योजकांना पूर्वी आपले सांस्कृतिक कर्तव्य वाटत होते. आज ही मानसिकता राहिलेली नाही. प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा

वाढता प्रभाव , दिवाळी अंकांची वाढणारी संख्या , दिवाळी अंकांच्या खपाची मर्यादा आणि जाहिरातदारांना अपेक्षित असणारा ग्राहकवर्ग दिवाळी अंकात जाहिरात देऊन मिळेलच याची खात्री नसल्यामुळे ते हात आखडता घेताना दिसतात. त्यामुळे दिवाळी अंकांचे अडचणीत

असणारे अर्थकारण अधिक धोक्यात आले आहे. त्यातून बाहेर पडण्यासाठी साहित्यप्रेमाबरोबरच पूर्ण व्यावसायिक दृष्टिकोन विकसित करून दिवाळी अंकांच्या मालकांनी आणि संपादकांनी सामूहिक प्रयत्न करणे गरजेचे आहे. अनेक संपादक आणि प्रकाशक एकत्र येऊन

वाचकांना सवलतीच्या दरात दिवाळी अंकाचा संच उपलब्ध करून देण्यासाठी योजना राबवित आहेत. त्या स्वागतार्ह आहेत. असे प्रयोग झाले पाहिजेत.

आज मराठीतल्या दर्जेदार दिवाळी अंकांची किंमत १०० ते १२० रु.च्या आसपास आहे. अंकाच्या निर्मितीचा खर्च विचारात घेता ती रास्तच आहे. जागतिकीकरणानंतर मध्यमवर्गीयांची आर्थिक ऐपत वाढली आहे. हा पैसा मॉल , मल्टीप्लेक्स , पिझ्झाहट आणि

पावभाजी-ज्यूसबारमध्ये सढळ हाताने खर्च होतो ; पण दिवाळी अंक खरेदीसाठी होत नाही. प्रत्येक मराठी घराने किमान दोन दिवाळी अंक विकत घेऊन वाचायचा निश्चय केला , तरी चित्र पालटू शकते.
असे असले , तरी दिवाळी अंकांच्या निमित्ताने विविध विषयांवर विपुल लेखन होते. प्रतिभेला बहर येतो. सर्जक शक्तीला आवाहन केले जाते. हे जास्त महत्त्वाचे वाटते. त्यातून संपादक लेखक-वाचकांचे स्नेहबंध दृढ होतात. वाचनसंस्कृती परिपुष्ट होते. विचारांना चालना

मिळते. नानाविध विषयांवर मंथन होते हे ही नसे थोडके.